# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २७/०३/२०२४ (बुधवार) सकाळ**

---

## सार्वत्रिक लोकसभा निवडणुक निमीत्ताने अवैध धंदयाविरूद्ध नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

आगामी सार्वत्रिक लोकसभा निवडणुक २०२४ चे अनुशंगाने मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी निवडणुक कालावधीमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडु नये म्हणुन नागपूर ग्रामीण मधील पोलीसांना अवैध धंदयाविरूद्ध कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. तसेच सदर कालावधीमध्ये सर्वत्र शांततामय वातावरणामध्ये सार्वत्रिक लोकसभा निवडणुक २०२४ ची पार पाडता येईल या अनुशंगाने सतर्क राहुन दारू, जुगार, रेती अवैध अग्नीशस्त्र, अवैध हत्यार, अजामीनपात्र वॉरंट जे आरोपी विरोधी असेल त्यांना ते बजावुन अंमलबजावणी करणे. सदर कालावधीमध्ये जे गुन्हेगार वारंवार गुन्हे करीत आहेत त्यांचेविरूद्ध योग्य प्रतिबंधक कारवाई करण्याचे आदेश दिले त्या अनुशंगाने नागपूर ग्रामीण मध्ये **दिनांक ०१ मार्च २०२४ ते आजपर्यंत** अवैध धंदयाविरूद्ध व आरोपीविरूद्ध खालीलप्रमाणे कारवाई केली.

**१)** जे आरोपी स्थानिक परीसरामध्ये राहील्यामुळे सामाजिक सुव्यवस्था बिघडवतात. तसेच त्यांच्यावर वरीलप्रमाणे प्रतिबंधक कारवाईचा कोणताही परीणाम झाला नाही. व त्यांना त्या परीसरातून हद्दपार केल्याशिवाय सामाजिक सुव्यवस्था अबाधित राहणार नाही. अशा एकुण आरोपी ०५ विरूद्ध मुबई पोलीस कायदा कलम ५६ अन्वये हद्दपार केले. तसेच कलम ५६ अन्वये एकुण ०३ आरोपीची चौकशी सुरू आहे. व  कलम ५७ अन्वये ०१ आरोपीविरूद्ध हद्दपार ची कारवाई केली आहे.

**२) एन.डी.पी.एस कारवाई:—** नागपूर ग्रामीण पोलीस घटकामध्ये वेगवेगळया पोस्टे अंतर्गत एकुण ०१ गुन्हा दाखल करून त्यामध्ये ०२ आरोपी अटक केली असुन त्यांच्याकडुन एकुण मुद्देमाल ४७९५०/—रू. एवढा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**३) अवैध रेती:—** नागपूर ग्रामीण पोलीस घटकामध्ये वेगवेगळया पोस्टे अंतर्गत एकुण ३५ गुन्हे दाखल करून त्यामध्ये ८२ आरोपी अटक केली असुन त्यांच्याकडुन एकुण मुद्देमाल ९२७६१९००/—रू. (नऊ कोटी सत्ताविस लाख एकसष्ट हजार नऊशे) एवढा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**४) अवैध दारू :—** नागपूर ग्रामीण पोलीस घटकामध्ये वेगवेगळया पोस्टे अंतर्गत गावठी दारू विक्रेत्याविरूद्ध एकुण २६० गुन्हे दाखल करून त्यामध्ये २६३ आरोपींविरूद्ध कारवाई करून यामध्ये रसायन सडवा २५७००लींटर व हातभट्टी दारू ७२३३ लीटर एकुण किमती १९९३७०५/—रू. चा मुद्देमाल नाश करण्यात आला.

तसेच देशी विदेशी दारू विक्रेत्याविरूद्ध एकुण २९४ गुन्ह दाखल केले असुन ३०२ आरोपी विरूद्ध कारवाई करून त्यामध्ये ९६६५५० मिली एकुण किमती १९४४२३१/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**५) अवैध जुगार:—** नागपूर ग्रामीण पोलीस घटकामध्ये वेगवेगळया पोस्टे अंतर्गत अवैध जुगार खेळणाऱ्याविरूद्ध एकुण ६४ गुन्हे दाखल करून त्यामध्ये १५७ आरोपींविरूद्ध कारवाई करून यामध्ये एकुण किंमती १२८५२९१/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**६) अवैधरीत्या अग्नीशस्त्र वापरणारे:—** नागपूर ग्रामीण पोलीस घटकामध्ये वेगवेगळया पोस्टे अंतर्गत अवैधरीत्या अग्नीशस्त्र वापरून समाजामध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एकुण आरोपीविरूद्ध ०७ गुन्हे दाखल असुन त्यामध्ये १८ आरोपी अटक केले असुन त्यांच्याकडुन एकुण ३०१५००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

तसेच अवैधरीत्या घातक शस्त्र जवळ बाळगुन लोकांमध्ये दहशत पसरविणाऱ्या एकुण गुन्हे ०४ दाखल करून त्यामध्ये ०७ इतके आरोपीविरूद्ध कारवाई केली असुन त्यांच्याकडुन एकुण १५८००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**७) अजामीनपात्र वॉरंटची बजावणी:—** सार्वत्रिक लोकसभा निवडणुका डोळयासमोर ठेवून ज्या आरोपीविरूद्ध न्यायालयामध्ये खटला सुरू असुन परंतु यातील आरोपी न्यायालयाने वांरवार न्यायालयात हजर राहण्याविषयी सांगुन देखील न्यायालयामध्ये हजर होत नाहीत. अशा आरोपीविरूद्ध न्यायालयाने अजामीनपात्र वॉरंट एकुण ६९८ आरोपीविरूद्ध काढले असुन त्यापैकी एकुण ३१९ आरोपीविरूद्ध सदर वॉरंटची बजावणी करून त्यांना न्यायालयासमोर हजर केले. तसेच निवडणुक अनुंशंगाने जे आरोपी मध्यप्रदेशचे रहीवासी असुन ते नागपूर ग्रामीण जिल्हयात राहतात. असे ५१ आरोपीविरूद्ध अजामीनपात्र वॉरंट काढले आहेत. तसेच जे आरोपी नागपूर ग्रामीण जिल्हयाचे रहीवासी आहेत व ते मध्यप्रदेशमध्ये राहतात असे एकुण ०६ आरोपीविरूद्ध अजामीनपात्र वॉरंट काढले आहे.

**८) प्रतिबंधक कारवाई:—** सार्वत्रिक लोकसभा निवडणुका डोळयासमोर ठेवून जे आरोपी वांरवार गुन्हे करत आहेत. ते कायदयाला जुमानत नाहीत व त्यांच्यामुळे समाजामध्ये भिती निर्माण झाली आहे. अशा अट्टल गुन्हेगाराविरूद्ध कडक प्रतिबंधक कारवाई केली असुन त्यामध्ये

अ) कलम १०७ जा.फौ. प्रमाणे एकुण ५२५ आरोपीविरूद्ध प्रकरण दाखल होवुन त्यामधुन १२८ आरोपीकडुन इंटीरीयम बॉड घेतला असुन त्यातील ०५ आरोपीकडुन फायनल बॉड ०१ वर्षाकरीता चांगल्या वर्तणुकीचा बंधपत्र घेण्यात आले.

ब) कलम १०९ जा.फौ. प्रमाणे एकुण ०७ आरोपीविरूद्ध प्रकरण दाखल केले आहेत.

क) कलम ११० जाफौ. प्रमाणे एकुण ३१८ आरोपीविरूद्ध प्रकरण दाखल झाले असुन त्यातील १२४ आरोपीकडुन इंटीरीयम बॉड घेतला असुन त्यातील ०९ आरोपीकडुन फायनल बॉड ०१ वर्षाकरीता चांगल्या वर्तणुकीचा बंधपत्र घेण्यात आले. तसेच ०२ आरोपीने बॉडचे उल्लंघन केले असुन त्यांच्याविरूद्ध कारवाई करण्यात आली.

ड) कलम ९३ मदाका प्रमाणे:— जे आरोपी अवैधरीत्या वांरवार दारू विक्री करीत आहे. व त्यांच्यावर पोलीसांनी वेळोवळी गुन्हे दाखल केले. तरी देखील त्यामध्ये कोणतीही सुधारणा न झाल्याने सदर आरोपी विरूद्ध कलम ९३ म. दा.का. प्रमाणे एकुण २६९ प्रकरण दाखल करून त्यातील ७८ आरोपीविरूद्ध इंटीरीयम बॉड घेण्यात आला आहे.

९) नागपूर ग्रामिण जिल्हयातर्फे लोकसभा निवडणूक २०२४ संबंधाने करण्यात येत असलेली कार्यवाही १) ०९ ठिकाणी आंतरराज्य सीमेवर व आंतरजिल्हा सीमेवर ०७ ठिकाणी अवैध दारू, अंमली पदार्थ व शस्त्रे इत्यादी तपासणी करिता चेक पोस्ट कार्यान्वित करण्यात आलेली आहे. २) fst /sst पथक कार्यान्वित करण्यात आलेले आहे. ३) अवर्गीकृत V I P ची सुरक्षा काढुन घेण्यात आलेली आहे.

मा. भारत निर्वाचन आयोग यांचेकडुन लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला असुन सदर निवडणुक शांततेत व निर्भय वातावरणात पार पाडण्याकरीता नागपूर ग्रामीण जिल्हयातील ०९— रामटेक लोकसभा अंतर्गत ०६ विधानसभा क्षेत्राकरीता स्टॅटीक सर्विलेन्स टीम व भरारी पथक नेमण्यात आले असुन त्यामध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. नागपूर ग्रामीण जिल्हयामध्ये एकुण (F.S.T) चे एकुण पथक १८ तयार करून त्यामध्ये १८ अधिकारी व ५८ अंमलदार ची नेमणुक केली आहे. (S.S.T) स्टॅटीक सर्विलेन्स चे एकुण पथक १८ तयार करून त्यामध्ये ५४ अंमलदार ची नेमणुक केली आहे.

तसेच जिल्हयातील आंतरराज्य व आंतरजिल्हा चेक पोस्ट खालील दिलेल्या प्रमाणे आंतरराज्य व आंतरजिल्हा चेकपोस्ट दि. १६/०३/२०२४ चे १८.०० वा. पासुन कार्यान्वित असुन आंतरराज्य एकुणे ०९ चेकपोस्ट ०९ अधिकारी व ३६ अंमलदार, आंतरजिल्हा चेकपास्ट –०८ मध्ये ०८ अधिकारी व ३२ अंमलदार आहेत.

१०) नागपूर ग्रामीण जिल्हयामध्ये सार्वत्रिक लोकसभा निवडणुक व सण उत्सवानिमीत्त एकुण १९ ठिकाणी रूटमार्च चे आयोजन केले होते. त्याचबरोबर जिल्हयामध्ये RPF चे ०३ प्लाटुन उमरेड, काटोल, रामटेक येथे तैनात केले आहेत.

११) आगामी लोकसभा निवडणुक व सण उत्सव शांततेत पार पाडण्याकरीता मनुष्यबळाची कमतरता पडु नये म्हणुन जिल्हयामध्ये जे पोलीस अंमलदार गैरहजर आहेत. अशा ४५ पोलीस अंमलदारांना मुंबई पोलीस कायदा चे कलम १४५ अन्वये नोटीस दिले आहेत.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**